MHOS120016442025	दाखल दिनांक	:	२२/०१/२०२०
	नोंदणी दिनांक	:	२७/०१/२०२०
	निकाल दिनांक	:	२२/०६/२०२६
	कालावधी	:	व. म. दि.
		:	०६ ०५ ००

भूम येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर भूम, जि. उस्मानाबाद

यांचे न्यायालयात

(पिठासिन अधिकारी - श्रीमती पी. एस. जाधव)

नियमित दिवाणी दावा क्र. १३७०/२०२५ **निशानी क्र.५५.**

(जुना नियमित दिवाणी दावा क्र. ५०/२०२०)

१. **अंगद विठ्ठल औताडे,**
वय- ४६ वर्षे, धंदा - शेती व मजुरी,
रा. वांगी (बु.), ता. भूम, जि. उस्मानाबाद. ……**वादी**

विरुध्द

१. **लक्ष्मी अंगद औताडे,**
वय - ३८ वर्षे, धंदा - शेती,
रा. वांगी (बु.), ता. भूम, जि. उस्मानाबाद.

२. **रुपेश परमेश्वर शेंडगे,**
वय - ४२ वर्षे, धंदा - शेती,
रा. भूम, ता. भूम, जि. उस्मानाबाद. ……**प्रतिवादी**

वादीतर्फे सन्माननीय विधिज्ञ	श्री. डी.आर.जावळे / श्री. पी.टी.गाढवे
प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे सन्माननीय विधिज्ञ	श्री. एस.बी.जाधव./श्रीमती ए.ए.गाढवे

दावा :- दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र.१ हे एकत्रित मालक आहेत असे जाहीर करून दावा मिळकतीवरील त्यांचे शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.२ अथवा त्यांचेमार्फत इतर कोणीही हरकत अडथळा करू नये म्हणून निरंतर मनाईसाठी तसेच प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात दिनांक ०७/११/२०१९ रोजी करून दिलेले नोंद खरेदीखत क्र. १८९७/२०१९ मुलतः रद्दबातल आहे असे जाहीर होवून मिळणेबाबत.

न्यायनिर्णय
(दिनांक २२/०६/२०२६ रोजी घोषित)

वादीने प्रस्तुतचा दावा मौजे वांगी (बु.) ता. भूम, जि. उस्मानाबाद येथील जमीन गट क्र. ३२२ पैकी क्षेत्र ०१ हे २० आर, आकार ०२ रु ०५ पैसे ज्याची चतुःसिमा पुर्वेस – विष्णु तुकाराम शिर्के व इतर यांच्या जमिनी, पश्चिमेस – गायरान, दक्षिणेस – विठोबा रामा कुदळे यांची जमीन व उत्तरेस तुकाराम विठ्ठल गिलबिले व तेलंगे यांची जमीन या चतुःसिमेच्या आतील दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र.१ हे एकत्रित मालक आहेत असे जाहीर करून दावा मिळकतीवरील त्यांचे शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.२ अथवा त्यांचेमार्फत इतर कोणीही हरकत अडथळा करू नये म्हणून निरंतर मनाईसाठी तसेच प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात दिनांक ०७/११/२०१९ रोजी करून दिलेले नोंद खरेदीखत क्र. १८९७/२०१९ मुलतः रद्दबातल आहे असे जाहीर होवून मिळणेबाबत दाखल केला आहे.

वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–

२. वादी हा प्रतिवादी क्र.१ चा पती असून त्यांना कसलेही अपत्य नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ चे एकत्र हिंदु कुटूंब आहे. वादी हा प्रतिवादी क्र.१ सह पुणे येथे राहून मजूरी करून उपजिविका करतो. त्यांना अपत्य नसल्याने वादीच्या उत्पनातील

बरीचशी रक्कम शिल्लक राहत होती. दावा मिळकतीचा मुळ मालक विठोबा रामा कुदळे यांनी सन २००५ मध्ये प्रापंचिक कारणासाठी ती विक्रीस काढली. वादीने ती मिळकत घेण्याची तयारी दर्शविली. त्यांचेमध्ये मिळकत रक्कम रुपये १,२५,०००/– ला विकत घेण्याचा ठराव झाला. सदरची रक्कम वादीने विठोबा कुदळे यांना दिली. दिनांक ०७/११/२००५ रोजी दावा मिळकतीचे खरेदीखत वादीचे हक्कात करण्याचे ठरले होते. परंतू वादी हा पुणे येथे राहत असल्याने त्याला भूम येथील दुय्यम निबंधक कार्यालयात येणे झाले नाही. त्यामुळे वादीने विचारविनिमय करून दावा मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी क्र.१ चे नावे करण्याचे ठरले व त्याची माहिती विठोबा कुदळे यांना दिली. त्यानुसार विठोबा कुदळे यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत क्र. २३६६/२००५ प्रतिवादी क्र.१ च्या लाभात करून दिले परंतू कब्जा मात्र वादी व प्रतिवादी क्र.१ यांना एकत्रित दिला. तेंव्हापासून वादी व प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकत मालकी हक्काने एकत्रित वहिवाटत आहेत.

३. वादीचे पुढे कथन की, प्रतिवादी क्र.१ चा भाऊ शिक्षक असून तो वादीबाबत प्रतिवादी क्र.१ चे मत कलुषीत करत असतो. प्रतिवादी क्र.१ तिचे भावाचे ऐकण्यात आहे. प्रतिवादी क्र.२ हा प्रतिवादी क्र.१ च्या भावाचा मित्र आहे. दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ चे नावे नोंदल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ , २ व प्रतिवादी क्र.१ चा भाऊ यांनी संगनमताने वादीचा त्यातील हक्क डावलण्याचे उद्देशाने दिनांक ०७/११/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या लाभात विनामोबदला व विनाताबा दावा मिळकतीचे नोंद खरेदीखत क्र. १८९७/२०१९ करून दिले. त्यामध्ये "कौटूंबिक हिताची जोपासना करण्यासाठी व कुटूंबातील सदस्यांचे पालणपोषण करण्यासाठी, आजारपणासाठी पैशाची गरज लागल्यामुळे", असा लिहिलेला मजकूर

धादांत खोटा व चुकीचा आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ च्या कुटूंबात त्या दोघांशिवाय कोणीही नसून दोघेही आजारी नाहीत. त्यामुळे सदरचे खरेदीखत मुलतः बेकायदेशीर आहे. सदर दावा मिळकतीचे खरेदीखत करून देण्यास प्रतिवादी क्र.१ हिस कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता व नाही. दावा मिळकत खरेदी घेण्यासाठी लागणारी संपुर्ण रक्कम वादीने दिली होती. ती वादीची स्वकष्टार्जित व स्वसंपादित मिळकत आहे. प्रतिवादी क्र.१ ही केवळ नाममात्र मालक आहे. तिला उत्पन्नाचे साधन नव्हते. त्यामुळे सदर खरेदीखताआधारे प्रतिवादी क्र.१ हि स्वतः मिळकतीची मालक नव्हती. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ हा ही दावा मिळकतीचा मालक व वहिवाटदार नाही. दिनांक ०५/०१/२०२० रोजी वादी दावा मिळकतीची मशागत करण्यासाठी गेला असता प्रतिवादी क्र.२ ने त्यास हरकत अडथळा केला व त्यावेळी त्याला प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कारण घडले. वादीची विनंती की, दाव्यात नमुद केल्याप्रमाणे दावा खर्चासह मंजूर करण्यात यावा.

४. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाव्याच्या आदेशिकेची बजावणी होताच दाव्याचे कामी हजर होवून निशाणी ३४ येथे कैफियत दाखल करून वादीचा दावा पुर्णपणे नाकारून आव्हानित केला आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ चे नातेसंबंध मान्य करून दाव्यातील इतर सर्व मजकूर प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारला आहे.

५. या प्रतिवादींचे पुढे कथन की, वादी व प्रतिवादी क्र.१ एकत्र राहत नाहीत. दावा मिळकतीच्या चतुःसिमा खोट्या व बनावट आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१ यांना अपत्य नसल्याने उत्पन्नातील बराचसा भाग शिल्लक राहत होता, विठोबा कुदळे यांनी दावा मिळकत विक्रीस काढली व ती घेण्याचे वादीने ठरवले, रक्कम रुपये १,२५,०००/- दावा मिळकतीची किंमत म्हणून वादीने विठोबा कुदळे यांना दिली,

दिनांक ०७/११/२००५ रोजी वादीला कामामुळे पुण्याहून भूमला येणे झाले नाही म्हणून त्याने विठोबा कुदळे यांना सांगून दावा मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी क्र.१ च्या नावे करण्यास सांगितले, त्याप्रमाणे विठोबा कुदळे यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी क्र.१ चे नावे केले, प्रतिवादी क्र.१ ही नामधारी मालक असून दावा मिळकतीचा खरा मालक वादी हाच आहे, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात विनामोबदला विनाताबा दावा मिळकतीचे नोंद खरेदीखत करून दिले, ते बेकायदा आहे, असे खरेदीखत करून देण्यास प्रतिवादी क्र.१ ला कायदयाने अधिकार नाही, दिनांक ०५/०१/२०२० रोजी दावा दाखल करण्यास कारण घडले हा व या आशयाचा दाव्यातील मजकूर निखालस खोटा असून तो प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारून आव्हानित केला आहे.

६. या प्रतिवादींचे पुढे कथन की, वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दिनांक ०६/०६/१९९८ रोजी लग्न झाले. लग्नानंतर दहा वर्ष व्यवस्थित गेले. प्रतिवादी क्र.१ हिस मुलबाळ होत नाही म्हणून वादीने तिला घरातून हाकलून दिले व दुसरे लग्न करून राहू लागला. प्रतिवादी क्र.१ ही उदास राहून कसेबसे जिवन जगू लागली. म्हणून तिचे भाऊ व वडीलांनी दावा मिळकत स्वतःचे पैशाचे प्रतिवादी क्र.१ ला विकत घेवून दिली. दावा मिळकतीशी वादीचा काहीही हितसंबंध नाही. तो खरेदीखतावेळी हजरही नव्हता. प्रतिवादी क्र.१ चा भाऊ बाळासाहेब मुळे याने स्वतःचे खात्यामधून पैसे काढून दिले होते. प्रतिवादी क्र.१ हिस पैशाची गरज लागल्याने व ती आजारी पडल्याने तसेच तिचेकडे उत्पन्नाचे साधन नसल्याने तिने दावा मिळकत योग्य मोबदला घेवून कायदेशीररित्या प्रतिवादी क्र.२ ला विकली. प्रतिवादी क्र.२ हा शिवसेनाचा कधीही सभासद किंवा तालुका अध्यक्ष नव्हता. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ हि दावा मिळकतीची

स्वतः मालक होती. ती विक्री करण्याचा तिला कायदेशीर अधिकार होता. त्या अधिकाराचा वापर करून तिने ती मिळकत प्रतिवादी क्र.२ ला विकली. प्रतिवादी क्र.२ हा दावा मिळकतीचा प्रामाणिक खरेदीदार आहे. प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. त्यामुळे तो नामंजूर करावा.

७. य प्रतिवादींचे पुढे कथन की, दावा मिळकतीवर खरेदीखतापासून प्रतिवादी क्र.१ चा कब्जा होता. वादीचा दावा मिळकतीवर कधीही कब्जा नव्हता. वादीचे नावे वडीलार्जित मिळकती असून त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ चा हिस्सा आहे. तो हिस्सा डावलण्याचे उद्देशाने वादीने हा खोटा दावा दाखल केला आहे. त्यामुळे तो खर्चासह फेटाळण्यास पात्र आहे.

८. या प्रतिवादींचे पुढे कथन की, प्रतिवादी क्र.१ ने वादीचे विरोधात पोटगी अर्ज क्र. १५८/२०२० फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल केला असून तो प्रलंबित आहे. वादीचा त्याबाबत रोष आहे. दावा मिळकत खरेदी केल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने तिचा पोत सुधारला व त्यासाठी फार मोठा खर्च केला. दावा मंजूर झाल्यास प्रतिवादी क्र.१ चे कधीही पैशास न भरुन येणारे नुकसान होणार आहे. कोणत्याही कारणाशिवाय वादीने खोटा दावा दाखल केला असल्याने तो खर्चासह फेटाळावा व नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी २५,०००/– प्रतिवादीला देण्यात यावेत अशी प्रतिवादींची विनंती आहे.

९. वादी प्रतिवादी यांचे कथनांवरून माझे सन्माननीय पुर्वाधिकारी यांनी निशाणी ३८ येथे विवादय मुद्दे इंग्रजी भाषेत निश्चित केले आहेत. त्यावरील कारणांसह निष्कर्ष नमुद केले आहेत ते खालीलप्रमाणेः–

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र.१ मालक व कब्जेदार आहेत असे वादी शाबीत करतो काय ?	नकारार्थी
२.	प्रतिवादी क्र.२ ने वादी व प्रतिवादी क्र.१ च्या दावा मिळकतीवरील शांततामय कायदेशीर कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला असे वादी शाबीत करतो काय ?	नकारार्थी
३.	वादी हा प्रतिवादी क्र.२ विरुध्द निरंतर ताकीद व जाहीरनामा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ?	नकारार्थी
४.	प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात करून दिलेले खरेदीखत क्र. १८९७/२०१९ हे रद्दबातल आहे असा जाहिरनामा होवून मिळण्यास वादी पात्र आहे काय ?	नकारार्थी
५.	आदेश व हुकूमनामा काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

का र ण मि मां सा

युक्तीवादः–

१०. वादीतर्फे सन्माननीय विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला. वादी व प्रतिवादी क्र.१ हिंदु एकत्र कुटूंब आहे. त्यांना अपत्य नसल्याने त्यांचे उत्पन्नाचा बराचसा भाग शिल्लक राहत होता, वादीने दावा मिळकत खरेदी घेण्याचा विठोबा कुदळे यांचेशी ठराव करून त्यांना रक्कम रुपये १,२५,०००/– दिले, खरेदीखताच्या दिवशी त्याचे कामामुळे तो भूमला येवू शकला नाही म्हणून त्याने पत्नीचे नावे खरेदीखत करून देण्यास विठोबा कुदळे यांना सांगितले व म्हणून प्रतिवादी क्र.१ चे नावे विठोबा कुदळे याने दावा मिळकतीचे खरेदीखत करून दिले, खरेदीखताची रक्कम वादीने जमा केली,

त्यामुळे वादी हा दावा मिळकतीचा मालक व खरेदीदार असून प्रतिवादी क्र.१ ही केवळ नामधारी मालक आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात करून दिलेले खरेदीखत हे बेकायदेशीर विनामोबदला व विनाताब्याचे आहे. त्यामुळे वादीचा दावा मागणीप्रमाणे मंजूर करावा असा युक्तीवाद केला.

११. प्रतिवादींतर्फे सन्माननीय विधिज्ञ यांचेकडून कोणताही युक्तीवाद करण्यात आला नाही. दिनांक २५/०२/२०२६ पासून दावा युक्तीवादासाठी आहे. तेंव्हापासून आजपर्यंत युक्तीवाद करण्याची पुरेपुर संधी प्रतिवादींना देण्यात आली आहे. आज रोजी प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ गैरहजर. मुदतअर्ज नाही. त्यामुळे दाव्याची पाच वर्षाहून अधिक काळ प्रलंबितता लक्षात घेता तो न्यायनिर्णयासाठी घेण्यात आला.

<u>वादीतर्फे पुरावाः</u>–

१२. वादीतर्फे वादी साक्षीदार क्र.१ अंगद विठ्ठल औताडे यांनी स्वतःचा शपथेवरील जबाब निशाणी क्र.३९ येथे नोंदवून दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. वादीतर्फे साक्षीदार क्र.२ बजरंग नामदेव गुंजाळ – दिनांक ०७/११/२००५ चे खरेदीखतावरील साक्षीदार यांनी स्वतःचा शपथेवरील जबाब निशाणी क्र.४८ येथे नोंदविला आहे. निशाणी क्र. ५० येथे वादीतर्फे पुरावा बंद पुरसीस दाखल केलेली आहे.

१३. कागदोपत्री पुराव्यामध्ये जमीन गट क्र.३२२ चा आठ अ उतारा निशाणी ०६ येथे, जमीन गट क्र. ३२२ चा सातबारा उतारा निशाणी ०७ येथे दाखल केला आहे. दिनांक ०७/११/२००५ चे विठोबा कुदळे यांनी प्रतिवादी क्र.१ चे लाभात करून दिलेले दावा मिळकतीचे खरेदीखताची साक्षांकित प्रत निशाणी ४२ येथे दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.१ ने दिनांक ०७/११/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.२ चे लाभात करून दिलेल्या खरेदीखताची साक्षांकित प्रत निशाणी ४३ येथे दाखल आहे.

प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे पुरावाः–

१४. प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे कोणताही कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा दाखल करण्यात आला नाही. निशाणी क्र.१ येथील दिनांक २५/०२/२०२६ रोजीचे आदेशाने प्रतिवादींचा पुरावा बंद करण्यात आला.

मुद्दा क्र.१ बाबतः–

१५. वादीचे कथन व पुरावा की, वादी व प्रतिवादी क्र.१ हे पती पत्नी असून त्यांना अपत्य नाही व त्यांचे एकत्र कुटूंब आहे. प्रतिवादींनी कैफियतीद्वारे वादी व प्रतिवादी क्र.१ चे नाते नाकारले नाही. तसेच त्यांना अपत्य नाही ही बाब ही वादातीत नाही.

१६. वादीचे कथन की, विठोबा कुदळे याने त्यांचे प्रापंचिक गरजेसाठी दावा मिळकत विक्री काढली, वादीने ती खरेदी घेण्याचे ठरविले, त्यांचेमध्ये दावा मिळकतीची किंमत रुपये १,२५,०००/– ठरली, वादीने सदरची रक्कम विठोबा कुदळे यांना दिली, दिनांक ०७/११/२००५ रोजी दावा मिळकतीचे खरेदीखत करण्याचे ठरले, परंतू वादीला कामामुळे भूम येथील दुय्यम निबंधक कार्यालयात जाणे शक्य नव्हते, म्हणून त्याने विठोबा कुदळे यांना प्रतिवादी क्र.१ चे नावे दावा मिळकतीचे खरेदीखत करून देण्यास सांगितले, त्याप्रमाणे विठोबा कुदळे यांनी प्रतिवादी क्र.१ चे नावे दावा मिळकतीचे खरेदीखत करून दिले. वादीने निशाणी ३९ येथे त्याचे कथनाप्रमाणे पुरावा दिला. वादीचा पुढे पुरावा की, दावा मिळकतीवर वादी व प्रतिवादी क्र.१ चा कब्जा आहे व ते दावा मिळकत मालकी हक्काने वहिवाटतात. दावा मिळकतीच्या खरेदीची किंमत वादीने दिली असल्याने प्रतिवादी क्र.१ हि दावा मिळकतीची नामधारी मालक होती.

त्यामुळे दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ ची मालकी कब्जे वहिवाटीची आहे.

१७. वादीने उलटतपासात दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ चे नावे खरेदी घेतली, सातबाराला तिचे नावाची नोंद झाली ही बाब मान्य व कबूल केली आहे. पुण्यामध्ये तो पेंटींग व मजूरीचे काम करतो असे वादी उलटतपासात सांगतो. वादीने त्याचे उलटतपासात त्याने मनेका या महिलेशी दुसरा विवाह केला व या कारणावरून त्याचे व प्रतिवादी क्र.१ चे सतत भांडण होत होते, म्हणून प्रतिवादी क्र.१ च्या भावाने दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ ला खरेदी करून दिली ही बाब उलटतपासात नाकारली. वादीने प्रतिवादी क्र.१ चे नावे दावा मिळकत खरेदी करून दिली याचे कागदपत्र उपलब्ध नाहीत, प्रतिवादी क्र.२ च्या नावे झालेल्या फेरफाराविरुध्द त्याने दाद मागितली नाही ही बाब उलटतपासात मान्य व कबूल केली आहे.

१८. वादीतर्फे साक्षीदार क्र.२ बजरंग नामदेव गुंजाळ हे दिनांक ०७/११/२००५ च्या खरेदीखतावरील साक्षीदार असून त्यांनी निशाणी ४८ येथील त्यांचे पुराव्यात तो वादी, प्रतिवादी क्र.१ व विठोबा कुदळे यांना ओळखतो, दिनांक ०७/११/२००५ रोजी मयत विठोबा कुदळे, अंगद औताडे यांनी त्याला खरेदीखत करण्याकरीता बोलावले होते, वादी अंगद औताडे यांनी सदरचे खरेदखत पत्नी लक्ष्मी म्हणजेच प्रतिवादी क्र.१ हिचे नावे करण्याविषयी गावामध्ये सांगितले होते, विठोबा कुदळे यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी क्र.१ च्या नावे करून दिले, खरेदीखताची रक्कम रुपये १,२५,०००/- विठोबा कुदळे यांनी वादीकडून खरेदीखतापुर्वीच घेतली होती व या व्यवहाराची त्यास पुर्ण माहिती आहे अशी साक्ष त्याने दिली. त्यावर साक्षीदार म्हणून त्याची सही आहे असेही तो सांगतो. सदरचे खरेदीखत निशाणी ४२ येथे आहे. पुरावा कायदयातील तरतुदीनुसार खरेदीखताची मुळ

प्रत अभिलेखावर दाखल करून शाबीत केली नाही. परंतू वादी व प्रतिवादींच्या कथनांमध्ये सदरचे खरेदीखत झाले होते याबाबत वाद नाही. त्यामुळे निशाणी ४२ चे खरेदीखत शाबीत पुराव्यात ग्राहय म्हणून वाचण्यास कोणताही कायदेशीर अडसर नाही.

१९. मी निशाणी ४२ चे दिनांक ०७/११/२००५ च्या खरेदीखताच्या साक्षांकित प्रतीचे काळजीपुर्वक अवलोकन केले. त्यामध्ये दावा मिळकतीची किंमत रक्कम रुपये १,२५,०००/- विठोबा कुदळे यांनी गावी ठरल्याप्रमाणे लक्ष्मी यांचेकडून घेतली असे नमुद असल्याचे स्पष्ट होते. दावा मिळकत सदर खरेदीखतान्वये प्रतिवादी क्र.१ लक्ष्मी यांचे ताब्यात मालकी हक्काने दिल्याचे स्पष्ट होते. दावा मिळकतीचा सातबारा उतारा निशाणी क्र. ०७ चे अवलोकन केले असता त्यावर भोगवटादार किंवा इतर अधिकारात वादीचे नावाची नोंद नमुद नाही. प्रतिवादी क्र.१ चे नावे ०१ हे २० आर क्षेत्र फेरफार क्र. ९६५ ने झाल्याचे दिसते. त्यामुळे वादी म्हणवतो त्याप्रमाणे दावा मिळकतीचे विठोबा कुदळे यांनी करून दिलेले खरेदीखतात दावा मिळकतीची किंमत वादी अंगद औताडे यांनी त्यांना दिली असे नमुद नाही किंवा सदरचे खरेदीखत अंगद औताडे तर्फे प्रतिवादी क्र.१ लक्ष्मी औताडे यांचे नावे करून दिले असेही नमुद नाही. दावा मिळकतीचे सातबारा उता-यावरील नोंदी पाहता दावा मिळकतीवर वादीचा सामाईक कब्जा आहे असेही दिसून येत नाही. त्यामुळे वादी दावा मिळकतीचा प्रतिवादी क्र.१ सोबत सामाईक मालक व कब्जेवहिवाटदार आहे या वादीच्या कथनांना पुष्टी देईल असा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही.

२०. वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचा पुरावा प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्याने आव्हानित झालेला नाही. असे असले तरी फारफार तर दावा मिळकत खरेदी

घेण्यासाठी वादीने पैसे दिले असा निष्कर्ष जरी काढला तरी दावा मिळकत पत्नीचे नावाने खरेदी करण्याची संमती वादीने दिली होती. बेनामी व्यवहार प्रतिबंधक कायदा १९८८ मधील तरतुदींनुसार एखादी व्यक्ती दुस–याचे नावावर मालमत्ता खरेदी करून त्याचा मालकी हक्क सांगु शकत नाही परंतू त्यास सदर कायदयातील कलम २ (९) (iii) नुसार पत्नी किंवा पतीला अपवाद दिला आहे. पती जर पत्नीचे नावे मालमत्ता घेत असेल तर ती पत्नीच्या फायदयासाठी किंवा एकत्र कुटूंबाचे फायदयासाठी घेतली असे गृहितक आहे. अशी पत्नीचे नावे घेतलेली मिळकत ही पतीच्या मालकीची आहे असे पतीला शाबीत करावयाचे असेल तर ती मिळकत पत्नीचे हितासाठी घेतली नव्हती हे सिध्द करणारे ठोस पुरावे पतीला दयावे लागतील. पतीने स्वतःचे पैशाने पत्नीचे नावावर खरेदी केलेली मालमत्ता ही तिला दिलेली भेट किंवा तिचे आर्थीक भविष्य सुरक्षित करण्यासाठीचे पाऊल मानले जाते. अशा मालमत्तेची पत्नी ही कायदेशीर मालक ठरते. त्यामुळे ती विकण्याचा तिला कायदेशीर हक्क प्राप्त होतो.

२१. प्रस्तुत दाव्यात वादीने दावा मिळकत स्वतःचे ज्ञात स्त्रोतातून पत्नीचे नावे खरेदी केली हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा जसे की सदरची रक्कम चेकने दिली किंवा खात्यावर जमा केली किंवा खात्यावरून काढून रोख स्वरुपात विठोबा कुदळे यांना दिली, वादीने अभिलेखावर दाखल केला नाही. ठराव झाला त्याचा साक्षीदार तपासला नाही. उलटपक्षी प्रतिवादींनी कैफियतीद्वारे वादीची सर्व कथने नाकारून प्रतिवादी क्र.१ चे भावाने व वडीलाने प्रतिवादी क्र.१ चे नावे दावा मिळकत खरेदी केली असा बचाव मांडला असला तरी त्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. असे असले तरी वादीने त्याचा दावा व त्यातील कथने त्याचे पुराव्यावर शाबीत करणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी बचाव शाबीत केला नाही

म्हणून वादीचा दावा शाबीत झाला असा निष्कर्ष काढता येत नाही. बेनामी व्यवहार प्रतिबंधक कायदा, १९८८ मधील कलम २ (९)(iii) तसेच कलम ३ व ४ मधील तरतुदी पाहता दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ चे मालकीची होती असा निष्कर्ष काढला तर वावगे ठरणार नाही कारण वादीने सदरची मिळकत त्याचे ज्ञात उत्पन्नाचे स्त्रोतातून प्रतिवादी क्र.१ चे नावे खरेदी केली व ती प्रतिवादी क्र.१ चे हितासाठी किंवा तिचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी घेतली नव्हती हे दर्शविणारा पुरावा दिला नाही.

२२. वरील सर्व तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकनावरून दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ ची एकत्रित मालकी कब्जेवहिवाटीची होती हे शाबीत करण्यास वादीस असफल ठरला आहे या निष्कर्षाप्रत मी आले आहे म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.२ बाबतः</u>–

२३. दावा मिळकतीतील वादीचे कायदेशीर कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.२ ने हरकत अडथळा केला असे वादीचे कथन व पुरावा आहे. दावा मिळकतीची कायदेशीर मालकी शाबीत करण्यास वादी असफल ठरला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ने हरकत अडथळा करण्याचा प्रश्न उदभवत नाही. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.३ बाबतः</u>–

२४. वादी दावा मिळकतीचा मालक व कब्जेवहिवाटदार असून प्रतिवादीने हरकत अडथळा केल्याने प्रतिवादी क्र.२ विरुध्द निरंतर ताकिद आदेशाची वादीने मागणी केली आहे. तसेच दावा मिळकतीचा वादी व प्रतिवादी क्र.१ मालक असून

प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात दावा मिळकतीचे करून दिलेले नोंद खरेदीखत बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मिळण्याची मागणी वादीने केली आहे. मुद्दा क्र.१,२ व ४ चे कारणांसहित निष्कर्ष पाहता दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ ची एकत्रित मालकी कब्जेवहिवाटीची होती, प्रतिवादी क्र.२ ने त्यास हरकत अडथळा केला हे वादीने शाबीत केले नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात दावा मिळकतीचे करून दिलेले नोंद खरेदखत विनामोबदला, विनाताबा असल्याचेही वादीने शाबीत केले नाही. त्यामुळे वादी जाहीरनामा व निरंतर ताकिद आदेश मिळण्यास पात्र नाही या निष्कर्षाप्रत मी आले आहे. म्हणून मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.४ बाबतः</u>–

२५. वादीचे कथन व पुरावा की, तो व प्रतिवादी क्र.१ दावा मिळकतीचे एकत्रित मालक व कब्जेवहिवाटदार आहेत असे असताना प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात बेकायदा दावा मिळकतीचे नोंद खरेदीखत क्र.११९७/२०१९ करून दिले ते विनामोबदला व विनाताबा आहे. वादीचे सदर पुराव्यास पुष्टी देणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. निशाणी ४३ येथील प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात करून दिलेले खरेदीखत पाहता त्यामध्ये मोबदला व ताब्याचा उल्लेख स्पष्ट नमुद आहे. दावा मिळकतीचा एकत्रित मालकी हक्क ज्याअर्थी शाबीत करण्यास वादी सफल झाला नाही त्याअर्थी प्रतिवादी क्र.१ दिनांक ०७/११/२००५ च्या खरेदीखताने दावा मिळकतीची कायदेशीर मालक व कब्जेवहिवाटदार झाली होती. याच अधिकारात ही मिळकत विकण्याचा तिला अधिकार होता. तिने दावा मिळकत प्रतिवादी क्र.२ ला नोंद खरेदीखताने विकली. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२

चे लाभातकरून दिलेले दावा मिळकतीचे नोंद खरेदीखत मुलतः रद्दबातल आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.५ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

आदेश

१. वादीचा दावा खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत केला.)

PRATIBHA PRABHAKAR KHAPE

Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2026.06.22 17:39:33 +0530

दिनांक: - २२/०६/२०२६

(श्रीमती. पी. एस. जाधव)
२रे सह दिवाणी न्यायालय व. स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

Name of Stenographer	...	Shri. D. B. Nikam Stenographer Grade-II
Court	...	2nd Jt. Civil Court Sr. Dn.,Bhoom.
Date	...	22/06/2026
Judgment signed by Presiding Officer on	...	22/06/2026
Judgment uploaded on	...	22/06/2026